# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र. २ /का.५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २१ जानेवारी, २०१७

प्रति,
महानगरपालिका आयुक्त,
बृहन्मुंबई, ठाणे, उल्हासनगर, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर,
नाशिक, अकोला, अमरावती व नागपूर.

विषय :- १० महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका-२०१७.
उमेदवाराच्या शपथपत्रातील माहिती व व्हिडीओ बाईटस् यास प्रसिध्दी देणेबाबत.
संदर्भ :- राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र. रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.२/का.५,
दि. २ जानेवारी, २०१७

महोदय,

आयोगाच्या संदर्भांकीत दि. २/१/२०१७ च्या पत्रान्वये राज्यातील १० महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या पूर्वतयारीबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

उपरोक्त सूचनांमधील मुद्दा क्र. १४ (२) व १४ (३) पुढीलप्रमाणे सुधारण्यात येत आहेत :-

| अ.क्र. | मुद्दा | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| १ | नामनिर्देशन पत्रासोबतच्या शपथपत्रातील माहितीच्या गोषवाऱ्यास वृत्तपत्रात जाहिरात देऊन प्रसिध्दी देणे. | सर्व महानगरपालिकांनी उमेदवारांनी नामनिर्देशन पत्रासोबत दिलेल्या शपथपत्राचा संगणकीय प्रणालीमधून प्राप्त होणारा गोषवारा सोबत जोडलेल्या नमुन्यात मतदानापूर्वी किमान एका वृत्तपत्रात प्रसिध्द करणे अनिवार्य. |
| २ | नामनिर्देशन पत्रासोबतच्या शपथपत्रातील माहितीचा गोषवारा मतदान केंद्राबाहेर फ्लेक्सच्या स्वरुपात लावणे. | सर्व महानगरपालिकांनी उमेदवारांनी नामनिर्देशन पत्रासोबत दिलेल्या शपथपत्राचा संगणकीय प्रणालीमधून प्राप्त होणारा गोषवारा सोबत जोडलेल्या नमुन्यात मतदान केंद्राबाहेर मतदारांना स्पष्टपणे वाचता येईल अशा आकाराच्या फ्लेक्सच्या स्वरुपात लावणे अनिवार्य. |

| | | |
|---|---|---|
| ३ | उमेदवारांचे व्हिडीओ बाईटस् | अंतिमत: निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या पूर्वसंमतीने त्यांच्याबद्दलची माहिती त्यांच्याच शब्दात सांगणारे २/३ मिनिटांचे व्हिडीओ बाईटस् स्वयंसेवी संस्था घेऊ शकतील व त्या त्यांच्या संकेतस्थळावर ठेवू शकतील. सदर व्हिडीओ बाईटस् महानगरपालिकांच्या संकेतस्थळावर ठेवण्यात येऊ नयेत. |

मा. राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

आपला,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक-रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.२ /का.५, दिनांक २१/०१/२०१७ सोबतचे सहपत्र

## महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक -२०१७

### निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी शपथपत्रात दिलेल्या माहितीचा गोषवारा

**प्रभाग क्रमांक. व नाव (असल्यास -)**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | शैक्षणिक अर्हता (कमाल) | मालमत्ता जंगम एकूण रुपये (रु.लाखात) (स्वत: उमेदवार, त्याचा पती/पत्नी अणि अवलंबितांची मिळून) | मालमत्ता स्थावर एकूण रुपये (रु.लाखात) (स्वत: उमेदवार, त्याचा पती/पत्नी अणि अवलंबितांची मिळून) | दायित्वे/थकीत रकमा (रु.लाखात) | उमेदवारांची गुन्हेगारी पार्श्वभूमी | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | दोन वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीची शिक्षा होऊ शकेल अशा प्रलंबित प्रकरणांची संख्या | ज्या अपराधासाठी दोषी ठरविण्यात आले आहे आणि एक वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीच्या कारावासाची शिक्षा देण्यात आली आहे अशा प्रकरणांची संख्या |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |

| Disclaimer (अस्वीकरण) | |
|---|---|
| | १) सर्वोच्च न्यायालयाचे सिव्हील अपिल क्र.७१७८/२००१ (युनियन ऑफ इंडिया वि. असोसिएशन फॉर डेमोक्रॅटीक रिफॉर्म व इतर) मधील दि.२ मे, २००२ च्या न्यायालयीन निर्णयाच्या आधारे |
| | २) वरील गोषवारा उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रासोबत दिलेल्या शपथपत्रामधील माहितीच्याआधारे देण्यात आला आहे. |
| | ३) उमेदवारांच्या मूळ शपथपत्राची प्रत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या सूचनाफलकावर / संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |
| | ४) उमेदवाराने सादर केलेल्या शपथपत्रातील माहीती चुकीची आहे असे प्रतिस्पर्धी उमेदवारास वाटत असल्यास त्याबाबत शपथपत्र निवडणूक निर्णय अधिका-यांकडे सादर करता येते. |

दिनांक-

निवडणूक निर्णय अधिकारी............... महानगरपालिका